RNI No. MAHBIL /2012/46121

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग दोन

वर्ष ८, अंक १०] गुरूवार, फेब्रुवारी ३, २०२२/माघ १४, शके १९४३ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १२.००

**असाधारण क्रमांक २१**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**

"उद्योग सारथी" , मरोळ औद्योगिक क्षेत्र, महाकाली गुहा मार्ग,
अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००९३.

**सूचना**

क्र.मऔविम/मुनि/A-३८५४९/२०२२

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६.**

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१अ) अन्वये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे विकास नियंत्रण नियमावलीमध्ये फेरबदल ;

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने, ज्या क्षेत्राकरीता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास (यानंतर "म.औ.वि.म" संबोधिलेले) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे (यानंतर "उक्त अधिनियम" असा उल्लेख केलेला ) कलम ४०(१अ) अन्वये "अधिसूचित क्षेत्राकरीता" विशेष नियोजन प्राधिकरण (यानंतर "विनिप्रा" असे संबोधिलेले ) म्हणुन नियुक्त करण्यात आले आहे, त्या क्षेत्राकरीता नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. टीपीबी/४३०८/४६५/सीआर ६४/०८/नवि-११, दिनांक ३१ ऑगस्ट, २००९ नुसार विकास नियंत्रण नियमावली मंजूर केली असून, ती दिनांक २४ सप्टेंबर, २००९ पासून अंमलात आलेली आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने, उक्त अधिनियमाचे कलम ३७(१अअ) नुसार प्राप्त अधिकाराचा वापर करून, नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. टीपीबी ४३१४/२०/आर-३२/२०१४/नवि-११, दिनांक १ ऑगस्ट, २०१५ नूसार, ज्यासाठी म.औ.वि.म विनिप्रा आहे, अशा एकात्मिक औद्योगिक क्षेत्राकरीता नियमावली लागू करण्यासाठी सदर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये फेरबदल मंजूर करण्यात आला आहे ;

आणि ज्याअर्थी, बदलत्या गरजांचा विचार करून, म.औ.वि.म. ने अस्तित्वातील विकास नियंत्रण नियमावली बदलून नवीन नियमांचा संच तयार करण्याचा निर्णय घेतला व त्यानुसार महाराष्ट्र राज्यातील म.औ.वि . म. चे सर्व क्षेत्राकरीता विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीचे प्रारुप तयार केले आहे ;

आणि ज्याअर्थी, म.औ.वि.म. ने दिनांक ३० नोव्हेंबर, २०२१ चे महामंडळाचे बैठकीत, प्रारुप सर्वसमावेशक विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमवाली २०२२ (यानंतर "प्रारुप सीडीसीपीआर" असे संबोधिलेले) वर जनतेकडून सूचना व हरकती मागविण्यासाठी ठराव पारित केलेला आहे ;

आणि त्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) नुसार प्राप्त अधिकारात, म.औ.वि.म. हे अस्तित्वातील विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली बदलून नवीन प्रारुप सर्वसमावेशक विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०२२ लागू करण्याबाबत इरादा घोषित करीत आहे व त्याकरीता सदर प्रारूप सर्वसमावेशक विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीवर ही सूचना **महाराष्ट्र शासन राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याचे दिनांकापासून एक महिन्याचे आत जनतेकडून सूचना व हरकती मागविण्यासाठी, ही सूचना प्रसिद्ध करीत आहे.

सदर फेरबदलावर कोणतीही सूचना/हरकती असल्यास त्या मुख्य नियोजक, म.औ.वि.म "उद्योग सारथी", मरोळ औद्योगिक क्षेत्र, महाकाली गुहा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००९३ यांचेकडे पाठवाव्यात. ही सूचना **महाराष्ट्र शासन राजपत्रात** प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याचे कालावधीत प्राप्त सूचनांचा सदर फेरबदल प्रस्ताव शासनास मंजुरीसाठी सादर करण्यापूर्वी विचार करण्यात येईल.

ही सूचना प्रारुप सीडीसीपीआर सह, सर्व कार्यालयीन कामकाजाचे दिवशी उक्त कालावधीमध्ये खालील कार्यालयात जनतेच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आली असून, ती *https:www.midcindia.org* या संकेतस्थळावर सुद्धा उपलब्ध आहे.

(१) मुख्य नियोजक, म.औ.वि.म. "उद्योग सारथी", मरोळ औद्योगिक क्षेत्र, महाकाली गुहा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००९३.

(२) म.औ.वि.म. ची सर्व प्रादेशिक कार्यालये.

मुंबई,
दिनांक ३ फेब्रुवारी, २०२२.

**प्रतिभा भदाणे,**
मुख्य नियोजक,
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,
मुंबई.

**MAHARASHTRA INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION**

Udyog Sarathi, Marol Industrial Area, Mahakali Caves Road,
Andheri (East), Mumbai 400 093.

*NOTICE*

No. MIDC/CP/A-38549/2022

THE MAHARASHTRA REGIONAL TOWN PLANNING ACT, 1966.

Modification to the Development Control Regulations for the Maharashtra Industrial Development Corporation under section 37(1) of the MR & TP Act, 1966 ;

Whereas, the Government of Maharashtra has sanctioned the Revised Development Control Regulations 2009 (hereinafter referred to as 'DCR') for the Maharashtra Industrial Development Corporation (hereinafter abbreviated as 'MIDC') *vide* Urban Development Department Notification No. TPB/4308/465/CR 64/08/UD-11, Dated 31st August, 2009 and the same have come into force with effect from 24th September, 2009 for the 'notified areas' under section 40 (1A) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as 'the said Act') where MIDC is the Special Planning Authority (hereafter abbreviated as 'SPA');

And whereas, the Government of Maharashtra, in exercise of the powers conferred under sub section (*1AA*) has sanctioned modifications to the said DCR *vide* Urban Development Department's Notification No. TPB 4314/20/R-32/2014/UD-11, dated 1st August, 2015 which are applicable to Integrated Industrial Areas for which MIDC is SPA under section 40 of the said Act;

And whereas, in view of the changing requirements, MIDC has decided to prepare one set of regulation to be made applicable to entire MIDC areas replacing existing regulations and accordingly prepared a set of Draft Development Control and Promotion Regulations to be made applicable to entire MIDC areas in the State of Maharashtra;

And whereas, MIDC in its Board Meeting No. 391 dated 30th November 2021 has resolved to publish the said set of Draft Comprehensive Development Control and Promotion Regulations 2022 (hereafter referred as 'Draft CDCPR') for inviting suggestions/ objections from General Public;

And whereas, in exercise of powers conferred upon it under section 37 (1) of Maharashtra Regional & Town Planning Act, 1966, MIDC declares its intention to replace the existing Development Control Regulations by new set of Draft Comprehensive Development Control and Promotion Regulations 2022 and for that purpose publishes a notice for inviting suggestions / objections from public with respect to the said draft Comprehensive Development Control and Promotion Regulations within a period of one month from the date of publication of this notice in the *Maharashtra Government Gazette*;

Any suggestion / objections on the said proposed modification be forwarded to the Chief Planner, MIDC, Udyog Sarathi, Marol Industrial Area, Mahakali Caves Road, Andheri (East), Mumbai 400 093. The suggestions / objections received within a period of one month from the date of publication of this notice in the *Maharashtra Government Gazette* shall be duly considered before submitting the modification proposal to the Government for sanction.

This notice with draft CDCPR is kept open for inspection to the general public in the following offices for the above period on all working days and is also available on website *https: / / www.midcindia.org.*

(1) Chief Planner, MIDC, Udyog Sarathi, Marol Industrial Area, Mahakali Caves Road, Andheri (East), Mumbai 400 093.

(2) All offices of the ROs / SPAs, MIDC.

Mumbai,
Dated 3rd February, 2022.

**PRATIBHA BHADANE**
Chief Planner,
Maharashtra Industrial Development
Corporation, Mumbai.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.